लोकमत

महाराष्ट्र शासन

# नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग

## संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय

## मध्यवर्ती कार्यालये, पुणे ४११००१

# जाहिरात क्रमांक 1/2023

महाराष्ट्र शासनाच्या नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभागांतर्गत पुणे / कोकण / नागपूर / नाशिक / औरंगाबाद / अमरावती विभागातील रचना सहायक (गट - ब) (अराजपत्रित) संवर्गातील रिक्त पदांवर नियुक्तीसाठी पात्र उमेदवारांकडून केवळ ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरावयाची सुविधा महाराष्ट्र शासनाच्या www.urban.maharashtra.gov.in व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या www.dtp.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर दिनांक ०१/०४/२०२३ पासून उपलब्ध होईल. तसेच सदर जाहीरात महाराष्ट्र शासनाच्या www.urban.maharashtra.gov.in, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या www.dtp.maharashtra.gov.in तसेच रोजगार व स्वयंरोजगार संचालनालयाच्या http://ese.mah.nic.in या संकेतस्थळांवर उपलब्ध होईल.

**वेळापत्रक**

| अ.क्र. | कार्यवाहीचा टप्पा | दिनांक व कालावधी |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन अर्ज व शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | ३०/०४/२०२३, वेळ २३.५९ पर्यंत |
| २ | प्रवेशपत्र ऑनलाईन प्रिंट काढून घेणे | १६/०५/२०२३ पासून परिक्षेपूर्वी पर्यंत |
| ३ | ऑनलाईन परीक्षेचा दिनांक | २९/०५/२०२३*** |

***आवश्यकतेनुसार परीक्षेच्या दिनांकामध्ये बदल झाल्यास त्याबातचा तपशिल संकेतस्थळावर प्रसिद्ध केला जाईल.

**रिक्त पदांचा तपशील :** संवर्ग-रचना सहाय्यक (गट - ब) (अराजपत्रित)

**वेतनश्रेणी** : वेतनस्तर एस - १४, रू.३८६०० - १२२८००/- अधिक नियमानुसार अनुज्ञेय भत्ते

| अ.क्र. | सामाजिक आरक्षण | भरावयाची एकूण पदे | समांतर आरक्षणाचा तपशील | | सर्व साधारण |
|---|---|---|---|---|---|
| | | | महिला ३० टक्के | खेळाडू ५ टक्के | |
| १. | २. | ३. | ४. | ५. | ७. |
| १. | अनुसूचित जाती | ३० | ०९ | ०२ | १९ |
| २. | अनुसूचित जमाती | २६ | ०८ | ०१ | १७ |
| ३. | विमुक्त जाती (अ) | ११ | ०३ | ०१ | ०७ |
| ४. | भटक्या जमाती (ब) | ०६ | ०२ | ०० | ०४ |
| ५. | भटक्या जमाती (क) | ०३ | ०१ | ०० | ०२ |
| ६. | भटक्या जमाती (ड) | ०३ | ०१ | ०० | ०२ |
| ७. | विशेष मागास प्रवर्ग | ०३ | ०१ | ०० | ०२ |
| ८. | इतर मागास वर्ग | २२ | ०७ | ०१ | १४ |
| ९. | ईडब्ल्यूएस | १८ | ०५ | ०१ | १२ |
| १०. | खुला | ५५ | १६ | ०३ | ३६ |
| | एकूण | १७७ | ५३ | ०९ | ११५ |

**टिप :**

१) वरील राखीव / बिनराखीव तसेच एकूण पदांच्या संख्येत बदल होण्याची शक्यता आहे. समांतर आरक्षणाचा उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच प्रवर्गातील अन्य पात्र उमेदवारांची निवड करून पद भरतीची कार्यवाही करण्यात येईल.

२) उपरोक्त १७७ रिक्त पदांपैकी ०२ पदे ही शासन नियमानुसार अनाथांसाठी आरक्षित असून, सदर पदे सामाजिक आरक्षणाचा विचार न करता भरली जातील.

३) उपरोक्त १७७ रिक्त पदांपैकी ०७ पदे ही शासन नियमानुसार दिव्यांगांच्या खालील प्रवर्गासाठी प्रत्येक गटासाठी (a,b,c,d) पुढील प्रमाणे पदे आरक्षित असून, सदर पदे सामाजिक आरक्षणाचा विचार न करता भरली जातील.

| | |
|---|---|
| (a) | कर्णबधीरता अथवा ऐकू येण्यातील दुर्बलता (D-Deaf, HH - Hard of Hearing) : - २ पदे |
| (b) | अस्थीव्यंगता / मेंदुचा पक्षघात (OA - One Arm, OL - One Leg, BL - Both Leg, OAL - One Arm and One Leg, Cp - Cerebral Palsy) / कुष्ठरोग मुक्त (LC - Leprasy cured) / शारीरिक वाढ खुंटणे (DW - Dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (AAV - Acid Attack Victims) : - २ पदे |
| (c) | विशिष्ट शिक्षण अक्षमता (SLD - Specific Learning Disabillty) : - २ पदे |
| (d) | एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व वरील (a) ते (c) (MD - Multiple Disabilities invoiving (a) to (c) above) : - १ पदे |

**सेवा प्रवेश नियमानुसार आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता :-**

| अ.क्र. | पद | किमान शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १ | रचना सहाय्यक (गट - ब) (अराजपत्रित) | स्थापत्य अभियांत्रिकी किंवा स्थापत्य आणि ग्रामीण अभियांत्रिकी किंवा नागरी व ग्रामीण अभियांत्रिकी किंवा वास्तुशास्त्र किंवा बांधकाम तंत्रज्ञान या मधील मान्यताप्राप्त संस्थेची, तीन वर्षांची पदविका किंवा तत्सम शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक. |

- उक्त पदासाठी अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उमेदवाराने किमान शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक आहे.

**वयोमर्यादा : -**

१) उक्त पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराचे अर्ज करण्याच्या दिनांकास किमान वय १८ वर्षे पूर्ण असावे व ४० वर्षापेक्षा जास्त नसावे. (मागासवर्गीयांसाठी / खेळाडूंसाठी / आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी / अनाथांसाठी वयोमर्यादा ०५ वर्षे शिथिलक्षम राहील.) तसेच दिव्यांग उमेदवारासाठी उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्ष इतकी राहील. त्याचबरोबर अगोदरच शासनाच्या सेवेत असलेल्या उमेदवाराच्या बाबतीत वयोमर्यादा १० वर्षांनी शिथिल राहील.

२) मागासवर्गीय उमेदवार, दिव्यांग आणि खेळाडू यांना असलेली वयोमयदितील शिक्षिलतेची सवलत यापैकी कोणतेही अधिकतम असलेली एकच सवलत देय राहील.

**परीक्षा शुल्क : -**

| पदनाम | अराखीव (खुला) प्रवर्ग | राखीव प्रवर्ग |
|---|---|---|



https://www.freshersnow.com/

| | | |
|---|---|---|
| रचना सहायक (गट - ब) (अराजपत्रित) | १०००/- | ९००/- |

- **उपरोक्त परीक्षा शुल्काव्यतिरिक्त बँक चार्जेस तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील.**
- प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज स्वीकारण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, अभ्यासक्रम, पदाची कर्तव्य व जबाबदाऱ्या इ. याबाबतच्या तपशिलासाठी www.urban.maharashtra.gov.in, www.dtp.maharashtra.gov.in व http://ese.mah.nic.in या संकेतस्थळावरील 'सर्वसाधारण सूचना' मध्ये उपलब्ध करून देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे.
- भरती प्रक्रिया संदर्भातील सर्व कार्यक्रम, कार्यक्रमातील बदल, सूचना वगैरे www.urban.maharashtra.gov.in, www.dtp.maharashtra.gov.in व http://ese.mah.nic.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येतील. उमेदवारांशी कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नसून, या संकेतस्थळावरून माहिती उपलब्ध करून घेण्याची दक्षता उमेदवारांनी घ्यावयाची आहे.
- स्पर्धात्मक परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशतः बदल करणे, पदांच्या एकुण व संवर्गनिहाय संख्येमध्ये बदल करण्याचे अधिकार शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना तसेच संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य पुणे यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. याबाबत कोणताही दावा करता येणार नाही.

दिनांक : २८/०३/२०२३
ठिकाण : पुणे

सही/- **(वि.ल.वाघमोडे)**
सदस्य सचिव,
राज्यस्तरीय निवड समिती, पुणे
तथा उपसंचालक, नगर रचना,
मुख्य कार्यालय, पुणे.

सही/- **(अ.भा.पाटील)**
अध्यक्ष,
राज्यस्तरीय निवड समिती, पुणे
तथा संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

Jalgaon Main
Page No. 11 Mar 29, 2023
Powered by: erelego.com